अग्रलेखांचा नवा काळ बादशहा
संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
नवा काळ
।। न मे भक्त: प्रणश्यति ।।
अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# तामिळनाडू सरकारवरच मनुष्यवधाचा खटला भरा

लाखो लोकांना दीपावलीच्या दिपोत्सवामध्ये आतषबाजीचा आनंद देण्यासाठी काबाडकष्ट करणाऱ्या शिवकाशीतल्या जवळपास साठ मजुरांच्या आयुष्यात कायमचा अंधार पसरला. केवळ दिवाळीच नाही तर वेगवेगळ्या आनंदाच्या प्रसंगी जे फटाके फोडले जातात त्यासाठी शिवकाशीतले हजारो कामगार दिवस-रात्र राबत असतात. त्यांच्या आयुष्यामध्ये दिवाळीचा खराखुरा आनंद कधी येतच नाही. कारण दिवाळीपूर्वी जास्तीत जास्त कष्ट करून पैसे कमावण्याचे त्यांचे हे दिवस असतात. देशभरात सगळीकडे फटाक्यांचा पुरवठा करणाऱ्या या शिवकाशीला अपघातांचा शाप मिळाला आहे की काय असे वाटायला लागते. नुकत्याच झालेल्या फटाक्यांच्या फॅक्टरीतल्या स्फोटात साठ मजुरांना आपले प्राण गमवावे लागले. सुरक्षा व्यवस्थेचे कोणतेच नियम न पाळले गेल्यामुळे हा अपघात घडल्याचे स्पष्ट झाले. ज्या फॅक्टरीत हा स्फोट झाला तिच्याकडे परवानाही नव्हता. यावरून शिवकाशीतला हा फटाक्यांचा उद्योग सामान्य मजुरांना रोजगार देण्याबरोबरच त्यांना वेठबिगार बनवणाराही बनला आहे. साधारणपणे दरवर्षी एकतरी स्फोट शिवकाशीतल्या कोणत्या ना कोणत्या तरी फॅक्टरीत झालेला दिसून येतो. आतापर्यंत झालेले स्फोट हे साधारणपणे जुलै, ऑगस्ट या कालावधीतच तिथे झाल्याचे दिसून येते. २००९पासून स्फोटांचे प्रमाण वाढले. जुलै २००९मध्ये झालेल्या स्फोटात बावीस मजुरांना मृत्युमुखी पडावे लागले. त्यानंतर २०१० मधल्या जून महिन्यात चार कामगारांना प्राण गमवावे लागले. तर २०११च्या ऑगस्ट महिन्यात लागोपाठ दोन स्फोट होऊन तेरा मजूर मृत्युमुखी पडले होते. २०११च्याच डिसेंबर महिन्यात असाच स्फोट झाला आणि त्यात चार कामगार मृत्युमुखी पडले. मात्र आता झालेल्या स्फोटात सर्वाधिक प्राणहानी झाली आहे. सातत्याने झालेले स्फोट हे शिवकाशीतल्या कारखान्यांमधली सुरक्षा व्यवस्था किती बेभरवशाची आहे हेच सिध्द करणारे ठरते. तिथले राज्य सरकार किंवा स्थानिक प्रशासन याबाबतीत अत्यंत बेपर्वा असल्याचेच म्हणावे लागेल. दरवर्षी अपघात होतो. पाच-दहा लोकांना आपले प्राण गमवावे लागतात आणि तरी मात्र तिथले सरकार जागे होत नसेल तर या अपघातांची पूर्ण जबाबदारी सरकारचीच ठरते. शिवकाशीतल्या कारखान्यांकडे योग्य ते परवाने नसले किंवा त्यांनी सुरक्षेची उपाययोजना न करणे हा सगळा बेबंदपणा सरकारने डोळे मिटून सहन करणे याच्या इतका दुसरा कुठलाही मोठा गुन्हा असू शकत नाही.

### बेदरकार सरकार

या आगीसंदर्भात संबंधित फॅक्टरीच्या चालक, मालकांवर गुन्हेही दाखल होतील परंतु त्याचा उपयोग काय असा प्रश्न शिल्लक राहतो. आतापर्यंत झालेल्या अपघातांमध्ये किती जणांवर खटले दाखल झाले आणि त्यातल्या किती लोकांना शिक्षा झाली. जर कठोर शिक्षा झाली असती तर तिथल्या कारखानदारांनी सुरक्षिततेचे काटेकोर पालन केले असते. सरकारकडून अक्षम्य ढिसाळपणा झाल्यामुळे शिवकाशीतले फटाक्यांचे कारखानदार बेपर्वा राहिलेले दिसतात. सरकारी अधिकाऱ्यांना पैसे चारून आपले अनधिकृत कारखाने चालवलेच शिवाय सुरक्षिततेची कोणतीही दक्षता पाळलेली नाही. अनेक वेळेला अशा प्रकारचे अपघात घडतात. कारखानदारांवर कारवाईचे नाटक केले जाते. परंतु नंतर हेच लोक मोकाट सुटतात. यावेळेला तर तब्बल साठ मजुरांचे प्राण घेण्याचा कृतघ्नपणा शिवकाशीत घडलेला आहे. या अपघाताची सर्वस्वी जबाबदारी राज्य सरकारने स्वीकारली पाहिजे. केवळ मृत्यमुखी पडलेल्यांच्या नातेवाईकांना लाख, दोन लाखांची मदत देऊन तामिळनाडूच्या मुख्यमंत्री जयललिता यांना आपली जबाबदारी झटकता येणार नाही. ज्या शिवकाशीमध्ये कोट्यवधी रुपयांची निर्मिती होते. अत्यंत जोखीम स्वीकारून तिथले कामगार काम करतात आणि त्याठिकाणी जर सरकारचेच दुर्लक्ष होत असेल तर तामिळनाडू सरकारवरच खरे तर मनुष्यवधाचा गुन्हा नोंदला गेला पाहिजे. धक्कादायक गोष्ट अशी असते की या अपघातानंतर एकाही सरकारी अधिकाऱ्यावर कारवाई होत नाही किंवा एकाही कारखानदाराला दहा पंधरा वर्षाची सक्तमजुरीची शिक्षाही दिली जात नाही. सामान्य मजूर मात्र जीवानिशी जात असतो. सत्ताधारी अधिकारी आणि व्यापारी मात्र तिजोरी भरत राहतात. सरकारी नियमांना धाब्यावर बसवणाऱ्या धटिंगणांनाही तितकीच कडक शिक्षा झाली पाहिजे. त्याशिवाय त्यांच्या मस्तीला लगाम बसणार नाही. शिवकाशीतल्या या मृत्यूच्या तांडवाला सरकारी कारभारच दोषी ठरतो. वारंवार आगीचे प्रकार होऊनही कोणतीच उपाययोजना होत नसेल तर तिथले सरकार आणि कारखानदार हे नराधमच ठरतात.

### जगणे हाच एक अपघात

एक गोष्ट मात्र अत्यंत खेदाने नमूद केली पाहिजे की प्रचंड लोकसंख्या असलेल्या आपल्या या देशात मनुष्याच्या जीवाला अजिबात किंमत उरलेली नाही, विशेषत: गरीब आणि सामान्य माणूस हा पैसेवाल्यांचा आणि सत्ताधाऱ्यांचा गुलाम ठरू लागला आहे. त्याला वेठीला धरून राजकारण केले जाते. मतांच्या पेट्या भरल्या जातात. करोडो रुपये कमावले जातात. पण त्या सामान्य माणसासाठी सामान्य स्वरूपाच्या सुविधाही दिल्या जात नाहीत. पश्चिम बंगालमध्ये कुपोषणामुळे डेंग्यू रोगाचा फैलाव झाला. तिथल्या मुख्यमंत्री म्हणतात खाणे कमी करा आणि पाणी भरपूर प्या, याचा अर्थ सत्ताधारी कोणत्याही पक्षाचा असला तरी तो बेपर्वाच वागतो, हे त्यातून दिसून येते. तिथला सामान्य माणूस आयुष्य सुखाने जगू शकत नाही. कायम काट्यावरचेच जगणे त्याच्या वाट्याला येते. मग रेल्वे अपघातात दरवर्षी साठ, सत्तर हजार लोक मरतात. रस्ते अपघातामध्ये चार ते पाच लाख लोक देशभरात आपले प्राण गमवातात. कुपोषणामुळे लाखो लहान मुलांची आयुष्य फुलण्याआधीच कोमेजून जातात. तर कृषीप्रधान देश असूनही शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्या लागतात. असे सामान्य माणसांचेच जगणे हिरावून घेणारे प्रकार सातत्याने वाढत आहे. शिवकाशीतल्या अपघाताने सामान्य माणसाचे जगणे हाच आता एक अपघात ठरू पाहत आहे.